उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, अकोट यांचे कार्यालय
दुरध्वनी संदेश व फॅक्स क्रमांक 07258 – 222674
ई - मेल sdo.akot@rediffmail.com

क्र/उविअ/अ.का./आस्था/कावी/ 263 /2020 दिनांक : 19 /10/2020

## जाहिरनामा

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, अकोट यांचे कार्यालयातील शासकिय वाहन निर्लेखित झाल्यामुळे मा.जिल्हाधिकारी, अकोला यांचे आदेशान्वये कार्यालयीन कामाकरीता खाजगी वाहन बोलेरो/ स्कॉर्पिओ/ कॉलिस/ मांझ्रो/ इनोव्हा/ क्रेटा यापैकी सन 2017 नंतरच्या सुस्थितीत असलेल्या गाडयांना प्राधान्य देण्यात येईल. वाहनाकरीता लागणारे इंधन कार्यालयामार्फत पुरविण्यात येईल. तरी इच्छुक निविदा धारक यांनी पुढील तपशिलासह जसे वाहनाचे नाव/ कंपनीचे नाव, वाहनाची कंपनी, वाहनाचा चेसीस नंबर, आसन क्षमता, वाहन टुरिस्ट/ लक्झरी टॅक्सी अंतर्गत नोंदणीकृत असलेले वाहन त्यांच्या आरसी बुकसह सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र जिल्हास्तरीय प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडुन घेतलेले असणे आवश्यक आहे. सदर वाहन 24 तासाकरीता कामावर राहिल, वाहनाचे अपेक्षित भाडे इत्यादी तपशिलासह मोहरबंद निविदा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, अकोट येथे कार्यालयीन वेळेत/ कार्यालयीन दिवशी दिनांक 29/10/2020 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत प्रत्यक्ष सादर करावे. त्यानंतर प्राप्त निविदेचा विचार करण्यात येणार नाही. दिनांक 02/11/2020 रोजी सकाळी 11.00 वाजता सदर निविदा उघडण्यात येतील. याची नोंद घेण्यात यावी.

(श्रीकांत देशपांडे)
उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी, अकोट

प्रतिलिपी:-1.मा.जिल्हाधिकारी, अकोला (नझारत शाखा) यांना माहितीकरीता सविनय सादर.
2. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला आपण सदर जाहिरनामा जिल्हयाचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.
3. सर्व उपविभागीय अधिकारी बाळापुर/अकोला/मुर्तिजापुर यांनी जाहिरनामा प्रसिध्द करून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयात सादर करावा.
4. तहलिसदार, अकोट यांनी जाहिरनामा प्रसिध्द करून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयात सादर करावा.
5.तहलिसदार, तेल्हारा यांनी जाहिरनामा प्रसिध्द करून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयात सादर करावा.
6.तहलिसदार, मुर्तिजापुर/अकोला/पातुर/बाळापुर/बार्शिटाकळी यांनी जाहिरनामा प्रसिध्द करून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयात सादर करावा.

(श्रीकांत देशपांडे)
उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी, अकोट

Scanned by CamScanner

# अटी व शर्ती

1. निवीदा मोहरबंद पाकीटात सादर करावी.
2. निवीदा स्विकारलेल्या वाहन धारकाने ज्या कार्यालयाकरीता वाहन भाड्याने घेतले आहे. त्या कार्यालयातील वाहन दररोज वेळेत सुस्थितीत हजर करावे.
3. दरपत्रकावरील दर ऊपप्रादेशीक परिवहन कार्यालयाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक असु नये.
4. वाहनासोबत वाहनाची कागदपत्र, लॉगबुक, अवजारे व अतिरिक्त टायर असणे आवश्यक आहे.
5. वाहन वापरणा-या अधिका-यांची लॉगबुकावर सही घेणे बंधनकारक राहील.
6. एखाद्या दिवशी वाहन नादुरूस्त झाल्यास पर्यायी वाहनाची विनाविलंब सोय करणे बंधनकारक राहील.
7. वाहन धारकाचे वाहन दिलेल्या कालावधीकरिता वापरण्यास सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र जिल्हास्तरीय प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडुन घेणे आवश्यक आहे. सुस्थीतीत न आढळल्यास करार रद्द करण्यात येईल.
8. वारंवार वाहन बंद पडत असल्यास किंवा इंजिनमध्ये खराबी निर्माण झाल्यास करार रद्द करण्यात येईल.
9. देयक सादर करतांना लॉगबुक पडताळणीकरीता सादर करावे. वाहन वापरलेल्या अधिका-याची सही लॉगबुकावर घेणे आवश्यक असुन, लॉगबुक सादर न केल्यास देयक पारीत करता येणार नाही.
10. भाड्याचे वाहन स्विकारतांना कालावधी कमी करणे किंवा वाढविणे हे गठीत केलेल्या समितीच्या अधिकारात राहिल.
11. वाहन धारकाविरूध्द गंभीर स्वरूपाची तक्रार आल्यास किंवा वेळोवेळी नियमांचे पालन न केल्यास करार त्वरीत रद्द करण्यात येईल.
12. अकोला जिल्ह्यात व वेळ पडल्यास जिल्ह्याबाहेर सुध्दा वाहनाचा वापर करण्यात येईल.
13. कंत्राट कालावधीत वाहनास अपघात वगैरे झाल्यास उपप्रादेशीक परिवहन कार्यालय, पोलीस कार्यालय व इतर प्राधिका-यांकडुन उदभवणा-या समस्याचे निराकरण वाहन मालकास करावे लागेल.
14. वाहनाचे भाडे महिना संपल्यानंतर त्यापुढील महिन्याचे दुस-या आठवडयात अनुदान उपलब्ध असल्यास प्रदान करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत याबाबतीत अग्रीम मंजुर करता येणार नाही.
15. वाहन मालकीचे असल्याबाबत विधीग्राह्य कागदपत्रे दरपत्रकासोबत जोडावे.
16. वाहनाचे परीक्षण, दुरूस्ती, कर, विमा व इतर अनुषंगीक खर्च वाहन मालकास करावे लागेल.
17. रूपये 100 च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करावा लागेल.
18. दरपत्रक (निवीदा) सादर करणा-याने त्याच्या स्वतःच्या कोणत्याही अटी शिवाय दरपत्रक सादर करावे.
19. केंद्रीय मोटार वाहन अधिनियम, 1988 च्या कलम 66 अन्वये योग्य तो परवाना असणे आवश्यक आहे.
20. प्राप्त निविदा स्विकारण्याचा अधिकार उपविभागीय अधिकारी, अकोट यांनी राखुन ठेवले आहे.

19.10.20

उपविभागीय अधिकारी, अकोट

Scanned by CamScanner